—: प्रेस नोट :— दिनांक : ३०.०५.२०१८

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २१ / २०१८ |
| कलम | कलम ७, १२ भ्र. प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपी व कार्यालय | १. सोपान रामभाऊ सुर्यवंशी, सहाय्यक राज्यकर आयुक्त, (ड ००५) अन्वेषण अ, मुंबई.<br>२. डी.व्ही. रेठरेकर, माजी विक्रीकर उप आयुक्त व लिगल प्रॅक्टिशनर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. २ कोटी |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | — |
| थोडक्यात माहिती | सदर प्रकरणामधील मॅकनेली भारत इंजिनियरींग ली. कंपनीच्या नागपूर येथील कार्यालयामध्ये राज्यकर विभागाच्या पथकाने सप्टेंबर — ऑक्टोबर २०१६ मध्ये अन्वेषण भेट दिली होती. सदर पथकामध्ये आलोसे सोपान सुर्यवंशी हे सहाय्यक म्हणून कार्यरत होते. सदर पथकाने वरनमूद कंपनीवर सन २०११—२०१२ ते २०१५—२०१६ या वर्षाच्या व्हॅल्यु ॲडेड टॅक्स रिटर्नमध्ये दोष काढून त्यांचे कंपनीस ३ कोटी ५५ लाखाचा अतिरीक्त टॅक्स लावला होता. त्यावेळी सदर कपंनीचे नवनियुक्त लिगल प्रॅक्टिशनर आलोसे क्र. २ श्री. डी.व्ही. रेठरेकर, माजी विक्रीकर उप आयुक्त यांनी कंपनीला अतिरीक्त टॅक्स भरण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे कंपनीने वरीलप्रमाणे अतिरीक्त टॅक्स भरला.<br>अन्वेषण भेटीचे एक वर्षाच्या कालावधीनंतर दि. ०६.११.२०१७ रोजी आलोसे सोपान सुर्यवंशी यांनी स्वतःचे मोबाईल नंबरवरून वरनमूद कंपनीचे उपाध्यक्ष यांचे मोबाईल क्रमांकावर टेक्स्ट मेसेज पाठवून त्यांना जबाब नोंदविण्यासाठी कार्यालयात हजर राहण्याबाबत तसेच इतर संचालकांची माहिती पाठविण्याबाबत कळविले व त्यांना कार्यालयात भेटण्यास बोलाविले. त्यानंतर दि. ०९.११.२०१७ ते दि.२०.११.२०१७ या कालावधीत आलोसे सोपान सुर्यवंशी यांनी आलोसे क्र. २ श्री. रेठरेकर यांच्या मोबाईल फोनवरून स्वतः तसेच आलोसे क्र. २ श्री. रेठरेकर यांच्याकडून वरनमूद कंपनीचे उपाध्यक्ष यांना फोन कॉल करून आलोसे क्र. १ सोपान सुर्यवंशी यांनी सप्टेंबर—ऑक्टोबर २०१६ या दरम्यान तक्रारदार यांच्या कंपनीवर दिलेल्या अन्वेषण भेटी दरम्यान कंपनीस केलेल्या मदतीच्या बदल्यात रुपये २ कोटी लाचेची मागणी आलोसे डी.व्ही.रेठरेकर यांचे मार्फत केली. तसेच आलोसे क्र. २ डी.व्ही. रेठरेकर यांनी कंपनीचे उपाध्यक्ष यांना फोनवरुन लाचेची रक्कम आलोसे क्र. १ सोपान सुर्यवंशी यांना अदा न केल्यास कंपनीच्या संचालकांना कार्यालयात बोलावून कारवाई केली जाईल असा इशारा देवून मागणी केलेली लाचेची रक्कम प्राप्त करण्यासाठी कंपनीचे उपाध्यक्ष यांना वेळोवेळी फोनकॉल करून पाठपुरावा केला व लाचेची मागणी करण्यासाठी आलोसे क्र. १ सोपान सुर्यवंशी यांना प्रोत्साहन देवून सहाय्य केले म्हणून त्यांचेविरुध्द वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई — ३०.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,
वेबसाईट — acbmaharashtra.gov.in, ईमेल : acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक - www.facebook.com - Maharashtra ACB
मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net
व्हॉट्स ॲप क्रमांक —९९३०९९७७००

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

30.05.2018

( एम.एन.मुगुटराव )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
ला.प्र.वि.,मुंबई विभाग, मुंबई.